# ॥ ज्योतिर्मय ॥

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक २६८ वा ❑ रविवार दि.२१ डिसेंबर २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

## दगडातून इतिहास साकारणारा कलावंत कालवश

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

**ज्योतिर्मय साहित्य**

काळाच्या कसोटीवर टिकून राहणाऱ्या शेकडो शिल्पांना आकार देणारे जागतिक ख्यातीचे शिल्पकार राम सुतार काळाच्या पडद्याआड गेले आहेत. नुकतीच त्यांनी (१९ फेब्रुवारी) वयाची शंभर वर्षे पूर्ण केली होती. राम सुतार यांनी शिल्पकलेच्या प्रांतातील चालता बोलता इतिहास अशी जगभरात ओळख निर्माण केली.

देशभरात राम सुतार यांनी अनेक मोठी शिल्प तयार केली आहेत. त्यामध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या स्टॅच्यू ऑफ युनिटीचा समावेश आहे. कारकिर्दीच्या गेल्या ६० वर्षांत त्यांनी २००हून अधिक भव्य शिल्पं तयार केली. सरदार वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू, गोविंद वल्लभ पंत यांच्यासह अन्य नेत्यांचीही शिल्पं राम सुतार यांनी घडवली. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल राम सुतार यांना २०१६ मध्ये पद्मभूषण आणि १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आले त्यांनी आपल्या हातानं विदेशातील महात्मा गांधींचे असंख्य पुतळे घडविले आहेत. संसदेसमोरील महात्मा गांधींचा कांस्य आणि पाषाणातील पुतळाही त्यांनी घडवला आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुतळे जगभरात भारताच्या समृद्ध वारशाचे प्रतीके म्हणून उभे राहिलेले आहेत.

४० वर्षांत पन्नासहून अधिक भव्य शिल्पं –देशभरात राम सुतार यांनी अनेक मोठी शिल्प तयार केली आहेत. त्यामध्ये, पंतप्रधान नरेंद्र मोदींचा ड्रीम प्रोजेक्ट असलेल्या स्टॅच्यू ऑफ युनिटीचा समावेश आहे. कारकिर्दीच्या गेल्या ६० वर्षांत त्यांनी २०० हून अधिक भव्य शिल्पं तयार केली. सरदार वल्लभभाई पटेल, जवाहरलाल नेहरू, गोविंद वल्लभ पंत यांच्यासह अन्य नेत्यांचीही शिल्पं राम सुतार यांनी घडवली. कला क्षेत्रातील योगदानाबद्दल राम सुतार यांना २०१६ मध्ये पद्मभूषण आणि १९९९ मध्ये पद्मश्री पुरस्कारानं सन्मानित करण्यात आलंय. त्यांनी आपल्या हातानं विदेशातील महात्मा गांधींचे असंख्य पुतळे घडविल आहेत. संसदेसमोरील महात्मा गांधींचा कांस्य आणि पाषाणातील पुतळाही त्यांनी घडवला आहे. त्यांच्या अथक प्रयत्नांमुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती शिवाजी महाराज आणि महात्मा ज्योतिबा फुले यांचे पुतळे जगभरात भारताच्या समृद्ध वारशाचे प्रतीके म्हणून उभे राहिलेले आहेत.

मालवणमधील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा  सालच्या महाराष्ट्र भूषण पुरस्काराचे मानकरी –ऋषीतुल्य व्यक्तिमत्त्व राम सुतार यांना राज्य सरकारचा २०२४ सालचा महाराष्ट्र भूषण पुरस्कार जाहीर करण्यात आला. त्यावेळी त्यांचे चिरंजीव अनिल सुतार यांच्याशी ईटीव्ही भारतनं एक्स्लुझिव्ह संवाद साधला होता. त्यावेळी त्यांचे पुत्र अनिल सुतार म्हणाले होते की, ‘‘आपण केलेलं काम लोकांना आवडल्यामुळं आम्हाला अजून कामं मिळतात. हाच सर्वांत मोठा पुरस्कार आहे. आपल्या हातून जे मोठं–मोठे पुतळे घडले आहेत. यातच आम्ही उत्तर भारतात स्थायिक झाल्यामुळं कदाचित महाराष्ट्र सरकारला आमच्याबद्दल इतकं माहीत नसेल. उत्तर भारतासह जगातही कामे केली केली आहेत. पण आता महाराष्ट्रात बरीचशी कामं होत आहेत. त्यामुळं सरकारला आमच्याबद्दल जास्त कळलं असेल. त्यामुळं महाराष्ट्र सरकारनं कदाचित आता पुरस्काराबद्दल ठरवलं असेल. पण हा पुरस्कार मिळाल्यामुळं आम्हाला खूप आनंद झालाय. वडिलांचं काम पाहून हा पुरस्कार देण्यात आलाय. त्यामुळं मलाही आनंद झालाय आणि वडिलांनाही होईल. आम्ही महाराष्ट्र सरकारचे खूप आभारी आहोत.‘‘ अनिल सुतार हे वडिलांचा शिल्पकलेचा वारसा समर्थपणे चालवणारे शिल्पकार आहेत. त्यांनी आपल्या वडिलांच्या मार्गदर्शनाखाली शिल्पकलेचे धडे गिरवले आहेत.

हैदराबादमधील १२५ फूट उंचीचा डॉ. बाबासाहेबांचा पुतळा

दगड आणि संगमरवरी शिल्पकलेवर प्रभुत्व–राम सुतार यांचा जन्म १९२५ मध्ये धुळे जिल्ह्यातील गोंदूर येथे गरीब सुतार कुटुंबात झाला होता. बालपण अत्यंत कठीण संघर्षातून जात असताना त्यांच्यामधील प्रतिभा त्यांचे गुरुजी श्रीराम जोशी यांनी हेरली. त्यांच्यामधील उद्योन्मुख कलाकार घडविण्यासाठी श्रीराम जोशी यांनी राम यांना मुंबईतील सर जे.जे. स्कूल ऑफ आर्टमध्ये प्रवेश घेण्यासाठी प्रोत्साहित केलं. जेजेमधून शिक्षण घेत असताना त्यांच्या उपजत असलेल्या प्रतिभेचा अधिक विकास झाला. राम सुतार जेजे स्कूलमध्ये सातत्यानं प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होत राहिले आणि अभ्यासक्रमाच्या शेवटी त्यांना मॉडेलिंगसाठी प्रतिष्ठित असं मेयो सुवर्णपदक मिळवलं. आयुष्यभर त्यांनी चित्रकला आणि मातीकाम कौशल्य शिकविणाऱ्या शिक्षकांबद्दल कृतज्ञता बाळगली. कारण, त्यांच्यामुळे त्यांना दगड आणि संगमरवरी शिल्पकलेवर प्रभुत्व मिळवता आलं. असं असलं तरी शिल्पकार राम यांना कांस्य धातुच्या ओतकामाची अधिक आवड होती.

छत्रपती संभाजीनगरमधील जगप्रसिद्ध असलेल्या अजिंठा लेण्यांचे पुनर्जतन करण्यासाठी पुरातत्व विभागाकडून १९५० मध्ये महत्त्वाचं काम करण्यात आलं. त्यावेळी त्यांनी मॉडेलर म्हणून अनेक शिल्पांना गतवैभव मिळवून देण्यासाठी काम केलं. त्यांचा १९५२मध्ये प्रमिला यांच्याशी विवाह झाला. १९५९ मध्ये माहिती आणि प्रसारण मंत्रालयात दृकश्राव्य प्रसिद्धी संचालनालय, प्रदर्शन विभागात तांत्रिक सहाय्यक म्हणून कार्यरत होते. मात्र, शिल्पकलेची जास्त आवड असल्यानं त्यांनी नोकरी सोडून स्वतंत्र करियर निवडणं पसंत केलं.

गांधी सागर धरणावरील चंबळ स्मारक हे त्यांनी केलेलं काम खूप चर्चेत आलं होतं. काँक्रीटच्या एकाच ठोकळ्यातून कोरलेली ही ४५ फ ूट उंच भव्य मूर्ती ही मध्य प्रदेश आणि राजस्थानमधील बंधुत्वाची प्रतिकम मानली जाते. ही मूर्ती एक माता दोन मुलांसह असल्याचं पाहून तत्कालीन पंडित जवाहरलाल नेहरुदेखील खूश झाले होते.


आनंदवनमध्ये आहे शिल्प उद्यान –महात्मा गांधींचा भव्य आकाराचा अर्धपुतळा ही त्यांच्या सुप्रसिद्ध कलाकृतींपैकी एक आहे. महात्मा गांधी शताब्दी सोहळ्याच्या निमित्तानं भारत सरकारनं रशिया, इंग्लंड, मलेशिया, फ्रान्स, इटली, अर्जेंटिना, बार्बाडोस आणि काराकास यांसारख्या देशांना महात्मा गांधींचे अर्धपुतळे भेट म्हणून दिले आहेत. हे पुतळे राम सुतार यांनी घडविलेले आहेत. नोएडा येथील राम सुतार यांचा स्टुडिओ संग्रहालयासारखा भव्य आहे. तिथे अनेक प्रतिष्ठित व्यक्तींच्या प्लास्टर ऑफ पॅरिसच्या भव्य प्रतिकृती तसेच अनेक मॉडेल्स मोठ्या संख्येनं आहेत. त्यांचे पुत्र अनिल सुतार यांनी वडिलांच्या कलाकृती एकत्र प्रदर्शित करून आनंदवन नावाचं एक विस्तीर्ण शिल्प उद्यान विकसित केलं. हे भारतामधील अनोखे कलादालन सूरजकुंड–भडखल तलाव रस्त्यावर वसलेलं आहे.

# पुण्यात ८ वा अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव २६ ते २८ डिसेंबर रोजी

## देश विदेशातील ७० हून जास्त चित्रपटांचे प्रदर्शन

**ज्योतिर्मय साहित्य**

पुणे – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य विभाग तसेच महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी व सांस्कृतिक विकास महामंडळ यांच्या सहकार्याने अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव समिती व निर्मिती मीडिया सोल्युशन्स यांच्या वतीने आयोजित ८ वा अण्णा भाऊ साठे आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव  २०२५ याचा उद्घाटन सोहळा शुक्रवार, २६ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय चित्रपट संग्रहालय, लॉ कॉलेज रोड, पुणे येथे उत्साहात पार पडणार आहे. अशी माहिती आयोजित केलेल्या पत्रकार परिषदेत महोत्सवाचे दिग्दर्शक संदीप ससाणे, प्रतिमा परदेशी, सहसंयोजिका नेहा भुकण, निलेश रसाळ यांनी दिली.






महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ लेखक व संपादक महावीरभाई जोंधळे व ज्येष्ठ अभिनेते डॉ. मोहन आगाशे यांच्या हस्ते पार पडणार आहे. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ‘‘तुंबाड फेम‘‘ व लवकरच प्रदर्शित होणाऱ्या मायासभा या चित्रपटाचे दिग्दर्शक राही अनिल बर्वे, अभिनेत्री वीणा जामकर, अभिनेते दीपक दामले, निर्माते गिरीश पटेल,निर्माते अंकुर जे. सिंग, क्रिएटिव्ह कन्सल्टंट व फिल्म समीक्षक आशिष निनगुरकर, पिकल एंटरटेनमेंटचे प्रमुख समीर दिक्षित व ऋषिकेश भिरंगी,दिग्दर्शक व महोत्सव परीक्षक सुनील सुकथनकर, व प्रसिद्ध दिग्दर्शक उमेश कुलकर्णी यांच्यासह अनेक नामवंत कलाकार, दिग्दर्शक व चित्रपट समीक्षक उपस्थित राहणार आहेत.

२६ डिसेंबर रोजी महोत्सव उद्घाटन झाल्यानंतर दिग्दर्शक राही बर्वे यांच्या चर्चेत असलेल्या व झिरकॉन फिल्म्सची निर्मिती असलेल्या मायासभा या हिंदी सिनेमाचे ओपनिंग फिल्म म्हणून विशेष स्क्रिनिंग होणार आहे.यावेळी या सिनेमाची टीम उपस्थित रसिकांसोबत संवाद साधणार आहे.२६ ते २८ डिसेंबर या कालावधीत चालणाऱ्या या महोत्सवात देश–विदेशातील एकूण ७० निवडक चित्रपटांचे प्रदर्शन सकाळी ९ ते संध्याकाळी ९ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. चित्रपट स्क्रिनिंगसोबतच विशेष चित्रपट चर्चा, दिग्दर्शकांशी संवाद सत्रे आणि वैचारिक परिसंवादांचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवात ऋत्विक घटक यांच्या ‘सुबर्णरेखा’ या चित्रपटावर विशेष संवाद सत्र होणार असून. महोत्सवाचा समारोप नितेश हेगडे दिग्दर्शित ‘वाघाची पहाणी (टायगर्स पॉंड)’ या चित्रपटाने होणार आहे तसेच सुलतान या चित्रपटाचे विशेष स्क्रिनिंग होणार आहे.

या वर्षीचा ‘निळुभाऊ फुले कलाकार कार्यकर्ता पुरस्कार  २०२५’ प्रसिद्ध अभिनेते व सामाजिक भान जपणारे कलाकार मकरंद अनासपुरे यांना जाहीर झाला असून, पुरस्कार वितरण सोहळा २८ डिसेंबर रोजी संध्याकाळी ६ वाजता होणार आहे. हा पुरस्कार प्रसिध्द नाटककार,लेखक व प्राध्यापक, अभिनेते प्रा. सतीश आळेकर यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे.

महोत्सवाचे आणखी एक आकर्षण म्हणजे लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या जीवनकार्यावर आधारित चित्रप्रदर्शन, भरवण्यात आले आहे. चित्रपटाच्या माध्यमातून सामाजिक वास्तव, संघर्ष आणि परिवर्तनाचा विचार मांडणारा हा महोत्सव पुण्यातील चित्रपटप्रेमींसाठी सांस्कृतिक पर्वणी ठरत आहे.त्यामुळे पुणे व राज्यातील सिनेमाप्रेमींनी या महोत्सवाचा आनंद घ्यावा.

# नवा सी–५ गट आणि डोनाल्ड ट्रम्प  यांचे राजकीय समीकरण

**ज्योतिर्मय साहित्य**



अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे मोठे चतुर राजकारणी आहेत. राजकारणात कोणते डाव केव्हा टाकावयाचे आणि कोणती नवी समीकरणे मांडावयाची हे त्यांना चांगले जमते. विशेषतः अशी समीकरणे मांडताना ते योग्य वेळ साधतात आणि जगाला धक्का देतात. त्यांच्या या धक्कातंत्राचा प्रत्यय नुकताच आला आहे. सरत्या वर्षाच्या पहिल्या आठवड्यात त्यांनी अमेरिका एक नवा कोर गट तयार करण्याच्या विचारात आहे, अशी घोषणा केली. या कोर गटामध्ये त्यांनी अमेरिका, रशिया, चीन, भारत आणि जपान या पाच राष्ट्रांचा समावेश केला आहे. त्यांनी मोठ्या खुबीदारपणे या गटातून अनेक बड्या युरोपीय राष्ट्रांना वगळले आहे. जर्मनी, फ्रान्स, इटली आणि खुद्द इंग्लंड यासारखी महासत्ता पैकी कोणत्याही देशाचा त्यांनी या गटात समावेश केलेला नाही. प्रश्न असा पडतो की नवा सी–५ हा गट जी–७ ची जागा घेईल का आणि जर खरोखरच स्थापन झाला तर हा गट इतर अनेक छोट्या गटांत बलशाली ठरेल काय, असे अनेक प्रश्न उभे राहतात. त्यामुळे ट्रम्प यांच्या या नव्या योजनेचे नव्या राजकीय समीकरणाचे काय परिणाम होतील, याची चर्चा प्रस्तुत लेखामध्ये केली आहे. या पाचही देशांपैकी भारत, रशिया, चीन हे युरेवशियाचे भाग आहेत प्रचंड लोकसंख्या, बलशाली लष्कर व संरक्षण तसेच आर्थिक प्रभुत्त्वामुळे हे देश बलशाली ठरले आहेत. राजकीय व्यवस्था भिन्न आहे. लोकशाहीची प्रकृती वेगळी आहे. तथापि, ही आंधळ्या भोपळ्याची मोट बांधून ट्रम्प यांना आपले हितसंबंध राखावयाचे आहेत. हा ३३ पानी अहवाल व्हाईट सुरक्षा विभागाने तयार केला आहे व तो अमेरिकेच्या रणनीतीचा भाग आहे.

त्यामागे कोणता डाव ?

ट्रम्प यांच्या या नव्या राजकीय समीकरणामागे कोणता डाव आहे, त्याचा गर्भित हेतू काय आहे आणि ट्रम्प यांच्या या नव्या खेळीमुळे जगाच्या राजकारणावर काय परिणाम होतील यापेक्षाही त्यांचा अंतस्थ हेतू काय आहे, हे लक्षात घेतले पाहिजे.

युक्रेनचा प्रश्न असो की जगातील अनेक आर्थिक प्रश्न असोत, अमेरिकेच्या राजकारणाला अलीकडे युरोपियन युनियन सदस्य राष्ट्रे पूर्वीसारखे सहकार्य करत नाहीत. त्यांची चाल बऱ्याच वेळा बदलली आहे, असे दिसते. त्यामुळे या नव्या सी पाच गटामध्ये एकाही युरोपियन देशाला घेतलेले नाही. एका अर्थाने ट्रम्प यांनी युरोपीय देशांना दिलेली ही चपराक म्हटली पाहिजे. ट्रम्प यांना एका दगडात दोन पक्षी मारावयाचे आहेत. एक म्हणजे त्यांना नाटो व युरोपियन युनियनचे महत्व कमी करावयाचे आहे.




नवे आर्थिक समीकरण

डोनाल्ड ट्रम्प यांचे अर्थकारण हे अमेरिकन सेल्फ या तत्त्वावर आधारले आहे. अमेरिकेचा बदलता दृष्टिकोन डोनाल्ड ट्रम्प यांच्या नव्या राजकीय समीकरणात दिसून येतो. या गटातील सर्व पाच देश आर्थिकदृष्ट्या समृद्ध आहेत. ट्रम्प त्यांच्याशी मैत्री करून आपला व्यापार वृद्धीचा हेतू साध्य करणार आहेत. टेरिफ धोरणानंतर अमेरिकेची जी बदनामी झाली ती धुवून काढण्याचा प्रयत्न आहे. या समिकरणामुळे नव्या बहुधृवी जगात अमेरिकेचा डॉलर त्यांना मजबूत करावयाचा आहे. अमेरिकेच्या विस्कटलेली घडी पुन्हा बसविण्याच्या प्रयत्नांतील हे एक भावी धाडसी पाऊल असेल.

नवे अंतरंग काय सांगते ?

बुद्धिबळाचा खेळ आहे. ते युरोपला चेकमेट देण्यासाठी आशियाचा उपयोग करत आहेत आणि चीनला चेकमेट देण्यासाठी भारत व जपानला पुढे करत आहेत. सुमारे पाच दशकांपूर्वी अमेरिका आशिया खंडाकडे उपेक्षेने पहात असे. आता नव्या जगामध्ये अमेरिकेचा प्रभाव घटत आहे, ही काळ्या दगडावरची रेघ आहे.

आशियाच्या राजकारणाकडे बघण्याचा अमेरिकेचा दृष्टिकोन बदलत आहे काय, असा प्रश्न पडतो. कारण त्यांनी आपल्या पाच संभाव्य गटांमध्ये आशियाच्या तीन देशांचा समावेश केला आहे. भारत जपानला मागे टाकून आर्थिक महासत्ता म्हणून पुढे सरसावत आहे आणि चीनला टक्कर देण्याच्या तयारीत आहे. अशावेळी ट्रम्प आता भारताकडे नव्या सकारात्मक दृष्टीने पाहत आहेत.

डोनाल्ड ट्रम्प यांचे राजकीय अंतरंग बदलत आहे. त्यामागे त्यांचा बदलत्या जगात भारताचे महत्त्व त्यांनी लक्षात घेतले आहे. चिनी ड्रॅगन झोपेतून जागा झाला आहे आणि आता तो सारे जग हादरवून टाकत आहे. चीन वगळता आशियात भारत आणि जपान या दोन मोठ्या शक्ती आहेत, हे ट्रम्प यांना कळले आहे. नव्या जगावर आपली एक पक्षीय हुकूमत प्रस्थापित होणे शक्य नाही, हे कटू सत्य ट्रम्प यांना कळले आहे. **(क्रमशः)**

## वास्तुशास्त्र पेंटिंग

### लघुलेख-१२१



*'आश्लेषा' नक्षत्राची देवता 'सर्प' आहे. कश्यप आणि कद्रु यांना सर्प संतती झाली. त्यांतले प्रमुख नवनाग म्हणजे अनंत, वासुकि, शेष, पद्मनाभ, कंबल, शंखपाल, धृतराष्ट्र, तक्षक आणि कालिया हे आहेत. सर्व धर्मामध्येच सर्पाबद्दल भितीयुक्त आदर आहे. त्यांचे पूजनही केले जाते. "मघा" नक्षत्राची देवता 'पितर 'आहे. "पितर 'ही देवसदृश योनी आहे. माणूस मेल्यानंतर एक वर्षाने 'पितरत्वा' ला जावून मिळतो. "पूर्वा फाल्गुनी" नक्षत्राची देवता 'भग" आहे.*

*'हस्त' नक्षत्राची देवता 'सविता' (सूर्य) आहे. 'सविता' हे जरी सूर्यचे नांव असले तरी 'सविता' ही एक स्वतंत्र देवता आहे. 'सविता' या शब्दाचा अर्थ 'प्रेरणा करणे', 'उद्दीपित करणे', 'चेतना देणे' असा आहे. उदयापूर्वीचा आणि अस्तानंतरचा सूर्य म्हणजे 'सविता' होय. 'सविता' हा सोनेरी हाताचा, सोनेरी डोळयांचा व सोनेरी जिभेचा आहे. संध्याकाळी त्याला अर्घ्य देतात. चित्रा नक्षत्राची देवता 'त्वष्ठा' आहे. ही देवता विश्वाची रचना करणारी कुशल कारागीर आहे. या देवतेने इंद्राचे 'वज्र' बनवून दिले आहे. ह्या देवतेचे आणखी एक महत्वाचं कार्य म्हणजे गर्भाशयातील गर्भ विकसीत करून, मनुष्य व पशुंना हा आकार देतो. 'स्वाती' नक्षत्राची देवता 'वायु' आहे. आहे. ही एक वैदिक देवता आहे. वायू ही अंतरिक्षाची देवता मानलेली आहे. 'वायु' ही देवता सुंदर, मनोगती आणि सहस्त्र नेत्रांची आहे. या देवतेच्या रथाला एक सहस्य अश्व ओढतात.*


*'विशाखा' नक्षत्राची देवता 'इंद्राग्नि' आहे. इंद्र व अग्नि मिळून एक देवताशक्ती बनलेली आहे. या दोनही देवता- जोडदेवता उग्र स्वरुपाच्या आहेत. मात्र त्या उदार पण आहेत. इंद्र ज्यावर प्रसन्न होतो त्याला सर्व काही देतो, अग्निमुळेच आपले अन्न तयार होते. पांच बोटांची मूठ वळवल्यावर जी अफाट शक्ती तयार होते; त्याच प्रमाणे या दोन देवता मिळून अफाट शक्ती बनलेली आहे.*

*नक्षत्र देवतां विषयी आपण माहिती घेत असतांना एकच उद्देश ठेवला आहे की, "वास्तुशास्त्र पेंटींग" मध्ये आपण ज्या नक्षत्र देवतेचा आकार चितारतो त्या देवतेबददल आपल्याला थोडीशी तरी माहिती असावी.*

क्रमश :

द्वारा एस्.व्ही.एस्. कला प्रतिष्ठान

डॉ. गजानन शेपाळ : 98691 30238




# जात्यावरच्या ओव्या......

नाम घेता देवा
मन भरून उरले
देहासाठी अवघ्या
घास खाऊन निजले ||४०७||

नाम ओठावर तुझे
जसा सुवर्णात पाचू
अभंगात तल्लीन
जन लागले नाचू ||४०८||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

# वारसा : काय आणि कितीचा




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

एका उद्योगपतीचं निधन झालं तेव्हा त्याच्या अंत्ययात्रेच्या प्रसंगी जमलेली मंडळी चर्चा करीत होती की त्यानं किती धन मागे ठेवलंय ? करोडोंचा बँक बॅलन्स, कित्येक किलो सोनं, कारखाने, बंगले, गाड्या इ. लोकांच्या दृष्टीनं किती ही गोष्ट महत्वाची होती. एखादा भ्रष्ट राजकारणी देखील आपल्या आयुष्यात प्रचंड माया कमावतो. प्रेम नाही. तो गेल्यानंतर लोकांमध्ये चर्चा सुरु होते की त्याने किती धन मागे ठेवलंय ? लोकांच्या दृष्टीनं किती महत्वाचा ! खरं तर काय आणि किती हे केवळ प्रश्नार्थक शब्द नाहीत. ती जीवनमूल्ये आहेत. एखादी व्यक्ती गेल्यानंतर त्यानं काय मागे ठेवलंय हे कितीपेक्षा अधिक महत्वाचं.



एका व्यक्तीला वाचनाची प्रचंड आवड होती. प्रचंड ग्रंथसंग्रह त्याने जमवला. आयुष्यात फारसे धन त्याने कमवले नाही. पण हे ग्रंथरूपी धन मात्र त्याच्याकडे भरपूर होते. आपल्या अंत्यसमयी त्याने आपल्या मुलाला जवळ बोलावून सांगितले, '' बाळा, मी तुझ्यासाठी फारशी संपत्ती ठेवू शकलो नाही. पण ही पुस्तके आहेत. हेच माझ्या दृष्टीने धन आहे. हा माझा वारसा आहे. हा जप. '' मुलावरही त्या व्यक्तीच्या वागण्याचे संस्कार झाले होते. तो म्हणाला, '' बाबा, तुम्ही विचारांचा वारसा मागे ठेवून जात आहात. तो माझ्यासाठी महत्वाचा आहे. पैसा मी माझ्या कर्तृत्वाने मिळवीन. पण तुम्ही दिलेला वारसा जीवापाड जतन करीन, तो वाढवेन. '' इथे कितीपेक्षा काय महत्वाचे !

सामान्य माणसं जेव्हा कितीचा विचार करतात तेव्हा त्याला जोडून आणखी प्रश्न त्यांच्या डोक्यात यायला हवा. तो म्हणजे कसं . खूप काही कमावलं. पैसा, सोनंनाणं, बंगले, गाड्या इ. आयुष्यात पैसा,धन महत्वाचं तर आहेच ! पण ते कसं याला महत्व आहे. संत तुकाराम महाराज म्हणतात त्याप्रमाणे जोडोनिया धन उत्तम व्यवहारे असं ते आहे का ?असं धन असेल तर ती लक्ष्मी ! नाहीतर ती नुसतीच संपत्ती. किती कमावलं याचीच आपण मोजदाद करत बसतो, नाही का ? पण कितीच्या आकड्यांच्या गर्दीत एक महत्त्वाचा प्रश्न राहूनच जातो. तो म्हणजे हे किती कसं कमावलं ? किती चा हव्यास आयुष्यभर संपत नाही. पण ते मिळवण्याच्या नादात आपण खूप काही गमावून बसतो. कितीच्या जगात चमक आहे, गजबज आहे. या जगाला आकड्यांची भूक असते. बँक बॅलन्स किती, जागा किती, प्रतिष्ठा किती ? आणि गंमत म्हणजे किती कमावलं याची माहिती सहज मिळते, पण ते कसं कमावलं याची खबर फार कमी लोक घेतात. कितीला जोडून कसं हा शब्द सहजपणे येतच नाही. कारण कसं मध्ये प्रश्न आहेत आणि कितीमध्ये गर्व. कसं मध्ये उत्तरदायित्व आहे आणि कितीमध्ये टाळ्या ! कधी कधी या कितीचा दबदबा इतका वाढतो की कसं चा प्रकाश दिसेनासा होतो. **(क्रमशः)**



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

# अनिर्वाच्यनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

मित्रांनो, आपण आता ४० व्या ओवीपर्यन्त आलो आहोत. संपूर्ण समास तत्वज्ञानावर आहे.

शुध्द व सरळ तर्कानें या अद्वेतमय सहजस्थितीची चर्चा व चिकित्सा केली तर आपण सध्या भ्रमात वावरतो एवढी आपल्या बुध्दीची जाणीव होते.

''मी अज्ञानी आहे''ही खात्री करून देणे हेच परमार्थाच्या क्षेत्रात माणसाच्या बुध्दीचे मोठे कौतुक आहे. मन अर्थरूप केले की आत्मज्ञानाने मिळणाऱ्या समाधानावर परमोच्च पातळीवर साधक पोहचतो. त्याच्या चित्तवृत्तीत स्वानंद असतो. अद्वैताच्या विवेचनामध्ये जेवढे ज्ञान सांगितले ते शब्दरूप असल्याने मायेच्या क्षेत्रात येते.

देहबुध्दीला ते खरे वाटले तरी स्वरूपानुभावाच्या बाजुने स्वप्नातील ज्ञाना प्रमाणेचं आहे.

एकदा का आत्मसाक्षात्कार झाला की ते आपोआप नाहीसे होते. मग शब्दांच्या पलीकडे असणारे स्वानंद सुख तेवढे शिल्लक रहाते।

४२ वी ओवी तर आपल्याला खुप मोठे ज्ञान सांगुन जाते. समर्थ म्हणतात.''आत्मज्ञानामध्ये संपूर्ण एकरूपता असते अनुभव व अनुभव घेणारा हे तिथे नसतात. तेथे शब्दज्ञानाला वाव नसतो. ज्ञानाच्या या अवस्थेत साधक अत्यंत शांत व स्वस्थ असतो

सद्गुरूच्या चरणीं सतत राहुन त्यांना शरण जाऊन,त्यांच्या तोंडचे शुध्द आत्मस्वरूपाचे निरूपण स्मरणात ठेवून सतत जागृत रहावे.हळूहळू आत्मसाक्षात्कार होऊ लागतो. परमपदाला पोहचण्यासाठी ज्ञान,निष्ठा वलयांकारी बैठक तयार होते. आपल्याला वाटते की जागृत अवस्था म्हणजे ती हीच असते.

पण हा केवळ भ्रम असतो. दृश्याचा अनुभव लयाच्या अनुभवात विरतो. शुन्याच्यापलीकडे अनुभव अनुभवरूपतेमध्ये विरून जातो. ''मी अनुभव घेतो'' या स्वप्नात्च असतो.


५० च्या पुढच्या ओव्यात तर ''अनिर्वाच्यनिरूपण''चा थोडक्यात सारांश सांगितला आहे. तो पुढील प्रमाणे .

तूं जागा झाला आहे पण तुझे स्पप्न अजूनही पूर्ण झाले नाही. ''मी तो आजन्मा आहे'' असे तूं स्वप्नात म्हणतो. याचा अर्थ तुझ्या जागेपणात स्वप्नाची महती संपत नाही. यालाच तर सहजस्थिती म्हणतात. सहजस्थिती असते यालाच ''विवेकाचा पाया'' म्हणतात. कोणत्याही बाबतीत सहजस्थिती, विवेक, वैराग्याची जाणीव नेणीव, जागृत पणे डोळसपणे सर्वावर समाधान मानावे ही तर विवेकाची ओळख आहे.

श्री राम जय राम जय जय राम
जय जय रघुवीर समर्थ
समास १० वा समाप्त, दशक ६ वा समाप्त

***

# जेथे भगवंताचें नामस्मरण तेथे सर्व संतांचें ठाण



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

जोंवर धरिली जगाची आस । तोंवर परमात्मा दूर खास ।। परमात्म्याची प्राप्ति । न होई राखता विषयासक्ति ।। जग विषयाकार राहिले । तेथे प्रेम केले तरी घातासी आले ।। विषयी एकजीव झालो जाण । सुटता न सुटे आपण जाण ।। मान, अपमान, जगाचे सुख-दुःख । हे स्वार्थाचेच मूळ आहे जाण ।। अभिमानात परमात्म्याचे विस्मरण। हें जीवपणाचें मुख्य लक्षण।। सुख-दुःख, विपत्ति - आपत्ति,। ही माया प्रपंचाची ओहोटी भरती।। आत्मनिश्चय बाणल्यावांचून। माया न हटे न सुटे जाण।। आता करी शूर मन। मायेसी हटवावे आपण।। जैसें जैसें बाहेर दिसलें। त्याचें बीज आपणाशीच उरलें।। एकच वस्तूची ओळखण जाण । पूर्ण होते समाधान।। ज्याच्यांत मानावें मी सुख। त्याच्यातच उद्भवतें दुःख।। नराचा होय नारायण। जर न चुकला मार्ग जाण।। जेथे ठेवावी आस। त्याचे बनावें लागतें दास।। देह तो पंचभूतांचा। त्याचा भरवसा न मानावा फारसा।। मी तुम्हांस सांगतों हित। दृश्यांत न ठेवावें चित्त।। दृश्य वस्तु नाशिवंत असते। भगवत्कृपेने समाधान येतें।।

परिस्थिति नसे बंधनास कारण। असे आपलेच मनाची ठेवण ।। देवास पाहावें ज्या रीतीनें। तसाच तो आपणास दिसतो जाण।। विषयाचा नाही झाला जोंवर त्याग। तोंवर रामसेवा नाही घडत सांग।। आपलें आत्यंतिक हित। हेंच खरा स्वार्थ जाण।। चित्तीं जे विषयापासून सुटले। ते आनंदासी आले।। रामनाम प्रेमयुक्त चाले धणी। त्यासी म्हणती ब्रह्मज्ञानी ।। द्रव्यदारावर्जित जाण। ही खरी संताची खूण।। सृष्टि पाहावी भगवदाकारी । प्रेम ठेवील त्याचेवरी। त्याला नाही दुसरी सरी ।। आल्यागेल्यास द्यावे अन्नदान। मुखानें भगवंताचें नाम। हृदयांत रामाची प्रीति। यासच थोर म्हणती जीवन्मुक्ति ।। न धरावी जगाची आस। तोच होऊ पाहे रामदास।। नामांत संत । नामीं भगवंत ।। वृत्ति राखावी अत्यंत शांत । हेंच संताचें मुख्य लक्षण जाण ।। जेथे भगवंताचें नामस्मरण । तेथे सर्व संतांचें ठाण।। अगरबत्ती जळून गेली। परि सुवासाने राहिली। तैसे रामचरणी झाले जे लीन । तेच खरे जिवंत जाण ।। संतचरणीं झाला लीन । त्याला भाग्यास नाही दुजें उणें। संताची संगति । भगवन्नामानें साधते ।। देहासकट माझा प्रपंच । रामा केला तुला अर्पण ।। ऐसें वाटत जावें चित्तीं । कृपा करील रघुपति ।।

# ॥ अनुभूती ॥

रामकृष्ण औसेकर
सिंहगड रोड, पुणे. मो. 98228 15640

## एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला



ज्योतिर्मय साहित्य

शेवटी एवढच म्हणायचं आहे की प्रपंच जरी कर्मस्थ असला तरी घृण्य आहे म्हणून देहाला धरुन आहे. मग वासना, भय, अदृश्य स्वरुपात आणि सुक्ष्म आहे. म्हणुनच अनुसंधान साधकासाठी देह धरावा. प्रपंचातील कमीला आणि मन पाहणे गुरुचरणाला

भगवंताच्या नामस्मरण गुरु कृपेची अखंड स्मृती जागृत ठेवली तर कुणालाही समाधानाची प्राप्ती होऊ शकते. ईश्वराकरीता श्रध्दा दृढ असावी आणि सदाचरण या दोन मुल्यावाचून जिवनाला पुर्तता होऊ शकत नाही. जीवनात ईच्छित मार्ग साध्य करण्यासाठी संताची संगत आणि भगवंतांचे नामस्मरण हे दोनच उपाय प्रापंचीकाला या संसार रुपी भव सागरातुन तारुन नेणारे आहेत. असे श्री महाराजांनी उपदेशपर सांगणे असे, म्हणूनच हरीपाठात श्री ज्ञानेश्वरांनी म्हटलेच आहे -

संताचे संगती। मनो मार्ग गती ।।
आकळावा श्रीपती येणे पंथी ।।

श्री महाराजांच्या अखेरच्या पर्वात यांच्या प्रकृती स्वास्थामुळे त्यांचा बाहेरचा संपर्क कमी झाला. महाराजांच्या भेटीसाठी आणि दर्शनासाठी माणसं सारखी येतच असत आपली प्रापंचीत दुखः सांगत काहीतरी मार्गदर्शन मिळवण्यासाठी येत असत. काही परमार्थ सांगण्यासाठी लोक महाराजांकडे येत असतात. अगदी शेवटच्या क्षणापर्यंत महाराजांनी सर्वांना मार्गदर्शन केले नेहमी माणसाच्या सानिध्यात सदैव रमलेले श्री महाराज शेवटीही त्याच गराड्यात होते. परंतु हे अनादी, अनंत, सदगुरु स्वरुपी विलीन झाले तो नेमका क्षण त्यांनी सर्वांना आपल्या मायेने चुकवुन एकट्यानेच अनुभवला तो दिवस होता माघ कृ. २ बुधवार दि. ११ फ ेब्रुवारी २००९ ते ब्रह्मस्वरुपात विलीन झाले.

''एक चैतन्य सूर्याचा अस्त जाहला''

असा ह्या श्री महाराजांच्या अनेक आठवणी अखंड अशा स्मरणात राहतील श्री महाराजांना आपण स्मृतीगामी असे म्हटले तरी वावगे होणार नाही. सद्गुरुने पुढील कार्य त्यांच्या आवतार समाप्ती नंतर गुरुपरंपरेने समर्थपणे पुढे नेण्याचे ते वर्धिष्णु करण्याचे असे दुसरे उदाहरण सापडणे कठीण आहे. म्हणुनच शेवटी असे म्हणावे लागते.

म्हणती गुरु त्याला । चालवीती सांप्रदाय आपला असे आमचे श्री महाराज अखंड स्मृतीगामी राहतील.




# खोकला

ज्योतिर्मय साहित्य

खोकल्याचं औषध घेण्यापूर्वी आपल्याला नेमका कोणत्या प्रकारचा खोकला झाला आहे, हे समजायला हवं!

सर्दी-खोकला ही जुळी भावंडं असल्यासारखे असतात. सर्दी झाली की काही दिवसांनी खोकला होतोच. विविध प्रकारचे धूर-धूळ वा वास नाकातोंडात गेल्यानं खोकला येतो. विशिष्ट प्रकारचे सेंट वा अत्तरं, रसायनांचे वास उदा. बॅगान स्प्रे वगैरे, आइस्क्रीम, थंड पाणी, शीतपेयं, सरबतं यांच्यामुळे खोकला होतो. थंड वातावरणात राहणं वा जाणं, एअरकंडिशन (वातानुकूलन) चा वापर अतिप्रमाणत करणं यामुळे खोकला होऊ शकतो. भरभर जेवताना एखादा कण श्वासामार्फत गेल्यामुळेसुद्धा खोकला येतो.

अति व्यायाम, ओझं उचलणं, अति चालणं, अति जागरण, अति बोलणं, दिवसा झोपणं, अति मैथुन करणं, अत्याधिक उपवास करणं, वेळी अवेळी भोजन करणं, कोरडे पदार्थ, शिळे पदार्थ खाणं इ. कारणांमुळे खोकला होतो. अति गोड, खारट, बुळबुळीत, मलावरोध उत्पन्न करणारे, अतिशय तेलकट, आंबट, कृत्रिम रंग आणि प्रिझरव्हेटिव्ह असणारे पदार्थ यांच्यामुळे खोकला होतो.


वात-कफाचा खोकला खोकला झाल्यावर तो वातप्रधान म्हणजे कोरडा असल्यास खोकताना फुटक्या भांड्याप्रमाणे आवाज येतो. बऱ्याच वेळा खोकला आल्यावर थोडा कफ पडतो आणि नंतर ढास थांबते. कफप्रधान म्हणजे ओला खोकला असल्यास खोकताना कफ सुटत असतो. तो वारंवार थुंकून टाकावा लागतो. क्वचित थोडा दम लागतो. बारीक ताप येणं किंवा अंग दुखणं यासारखी लक्षणं उत्पन्न होतात. आवाज बसणं, खोकून तोंडाला कोरड पडणं, थकवा जाणवणं यासारखी लक्षणं दिसतात. कोरडा खोकला होतो. त्याला डांग्या खोकला म्हणतात.

कफाच्या खोकल्यावरचा इलाज कफप्रधान खोकला असल्यास सुंठ, मिरी, पिंपळी यांचं चूर्ण मधातून चाटवावं. सुंठ टाकून उकळलेलं पाणी प्याल्यानं खोकला आणि कफ कमी होतो. अडुळसा या वनस्पतीचा रस काढून त्यात मध टाकून किंवा त्याचा काढा करून पाजल्यास खोकला कमी होतो. कोरफड भाजून त्यातील गर काढून त्यात मध मिसळून चाटवल्यास खोकला कमी होतो. दालचिनी पावडर मधातून वारंवार चाटवावी त्यानं खोकला कमी होतो. द्राक्षासव, कुमार आसव, अडुळसा सिरप, पिंपलासव ही बाजारात मिळणारी औषधे उपयुक्त आहेत. छातीला तीळ तेल आणि सैंधव एकत्र करून मॉलिश करावी आणि गरम पाण्याच्या पिशवीनं आणि कपड्यानं शेक द्यावा. दोन चमचे तुळशीचा रस आणि एक चमचा आल्याचा रस आणि मध असं चाटण द्यावं किंवा तुळशीचा काढा करून प्यावा. यामुळे खोकला कमी होतो. गवती चहाचा काढा करावा. त्यात सुंठ, पिंपळी, दालचिनी, मिरी आणि गूळ टाकून एक कपभर काढा पाजावा. कफ खोकला आणि सर्दी कमी होते. वेलदोडे आणि लवंग तव्यावर भाजून त्याची राख मधातून चाटवल्यास कफ खोकला त्वरित कमी होतो.

कोरड्या खोकल्यावरचे उपाय कोरडा खोकला किंवा वातप्रधान खोकला असल्यास खोबरेल तेल, तीळाचं तेल किंवा सहचर तेल वा दोन तीन चमचे गायीचं तूप, गरम पाणी आणि चिमूटभर सैंधव मीठ असं एकत्र करून पाजल्यास खोकल्याची ढास त्वरित कमी होते. तेल किंवा तूप हे या खोकल्यातील प्रभावी औषध आहे.

**(क्रमशः)**

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



# श्रीरामचरितमानस

विद्यावाचस्पती
चंद्रहास शास्त्री सोनपेठकर
मो. 98500 74418

ज्योतिर्मय साहित्य

अति ममता माणसाला चिकटून राहणारी, सुटत न जाणारी व्याधी बनते. मत्सर हा सतत टोचणारा विकार आहे. अति हर्ष आणि अति दुःख हे घशाचे रोग सांगितले आहेत, कारण ते विवेकाचा आवाज दाबून टाकतात. दुसऱ्याचे सुख पाहून जळणे ही सर्वांत घातक मानसिक अवस्था आहे. दुष्टपणा आणि मनाची कुटिलता हे कुष्ठरोगासारखे आहेत, जे व्यक्तीच्या संपूर्ण व्यक्तिमत्त्वाला विद्रूप करतात.

अहंकार अति दुखद डमरुआ।
दंभ कपट मद मान नेहरुआ।।
तृस्ना उदरबृद्धि अति भारी।
त्रिबिधि ईषना तरुन तिजारी।

अहंकार हा मानेचा अत्यंत वेदनादायक आजार असल्याचे सांगून तुलसीदास त्याचे परिणाम सूचित करतात. दंभ, कपट, मद आणि मान हे नसांचे रोग आहेत, कारण ते अंतर्मनाची संवेदनशीलता नष्ट करतात. तृष्णा म्हणजे कधीही न संपणारी इच्छा ही जलोदरासारखी आहे, जी सतत वाढतच जाते. पुत्रेषणा, वित्तेषणा आणि लोकेषणा या तीन तीव्र इच्छा शक्तिशाली किड्यांप्रमाणे जीवन आतून पोखरून काढतात.

जुग बिधि ज्वर मत्सर अबिबेका।
कहँ लगि कहौं कुरोग अनेका ।।

मत्सर आणि अविवेक हे दोन प्रकारचे ताप आहेत, जे माणसाच्या विचारशक्तीला आणि निर्णयक्षमतेला सतत जाळत राहतात. अशा असंख्य दुर्गुणरूपी रोगांचे वर्णन करणे अशक्य आहे, असे कवी सांगतात.

एक ब्याधि बस नर मरहिं ए असाधि बहु ब्याधि। पीड़हिं संतत जीव कहुँ सो किमि लहै समाधि ।।

या अंतिम दोह्यात अत्यंत गंभीर सत्य मांडले आहे. माणूस एका रोगाने मरतो, पण असंख्य असाध्य मानसिक व नैतिक व्याधी आयुष्यभर त्याला छळत राहतात. अशा स्थितीत जीवाला खरी शांती, समाधी किंवा आत्मिक समाधान कसे मिळेल, हा मूलभूत प्रश्न येथे उपस्थित केला आहे.

उपसंहार - तुलसीदासांचे हे दोहे आजच्या काळात अधिकच अर्थपूर्ण वाटतात. बाह्य प्रगतीच्या झगमगाटात अंतर्मनातील विकार दुर्लक्षित राहतात. श्रीरामचरितमानस आपल्याला सांगते की खरी चिकित्सा शरीराची नव्हे, तर मनाची आणि वृत्तीची आहे. मोह, अहंकार, लोभ, मत्सर यांचा त्याग आणि विवेक, संयम, करुणा यांचा स्वीकार केल्याशिवाय मनुष्याला खरी शांती मिळणे अशक्य आहे. या दृष्टीने हे दोहे केवळ जीवनोपयोगी आध्यात्मिक मार्गदर्शन करतात. **(क्रमशः)**

# भाषेला ‘सक्ती’ केली की विरोधाच्या प्रतिक्रिया उमटणारच - जेष्ठ साहित्यिक दामोदर मावजो

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर कोणत्याही भाषेला समृद्धपण येते ते अन्य भाषांमधील शब्दांचा स्वीकार करण्यातून. कोणत्याही प्रकारची सक्ती केली की विरोधाची प्रतिक्रिया उमटत असते. महाराष्ट्रातही हिंदीला विरोध होण्यामागे ‘सक्ती’ हा प्रकार असू शकतो. त्यासाठी कुठल्याही एका भाषेची सक्ती नको, असे स्पष्ट मत ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त ज्येष्ठ कोंकणी साहित्यिक दामोदर मावजो यांनी मांडले. साहित्य हे साहित्यच असते, त्यात ग्रामीण, दलित, असं काही नसतं, त्याचे वर्गीकरण समीक्षकांना करू द्यावे, असेही ते म्हणाले.

देशात भाषांची विविधता आहे. भाषा-भाषांमध्ये नाही तर भाषावादींत वैर असते. काहींना भाषांमध्ये वाद हवा असतो. गोव्यात मराठी-कोंकणी भाषेत कुठलाही वाद नाही, असे सांगत मावजो म्हणाले, कोणाला मान्य असो अथवा नसो, लिहिण्याचे काम आपण करतो आहोत. मला लिखानाची कधीच भीती वाटली नाही. गौरी लंकेश यांच्या हत्येनंतर दैनिकांमध्ये



लिहिलेल्या इंग्रजी लेखांचे संकलन ‘इंक ऑफ डिसेंट’या पुस्तक रुपात समोर आले तेव्हा आपल्याला पोलीस संरक्षण देण्यात आले. त्याचे गोव्यातील नागरिकांना आश्चर्य वाटले होते.

आपल्या साहित्याचे हिंदी-इंग्रजीच्या तुलनेत मराठीत अनुवाद तुलनेने अधिक झाला नाही, अशा भावना व्यक्त करून मावजो यांनी तरुणांचे प्रश्न साहित्यात प्रतिबिंबित झाले तर त्यांच्याकडून साहित्य वाचले जाईल, असे सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्तेसह नवीन माध्यमांना दोष देण्यात अर्थ नाही. इतिहास माहित असलेली तरुण पिढी फार कमी असून, इतिहास योग्य त्या प्रकारे शिकवला जात नाही.


हिंदू समाजाचे प्रश्न जसे साहित्यातून मांडले जात आहेत, तसे ख्रिश्चन, मुस्लिम समुदायाचे प्रश्न प्रतिबिंबित होत नाहीत. ‘रायटर इज फायटर’ असे म्हटले जाते, असे सांगत त्यांनी आपल्या विवेक बुद्धीला पटते ते लिहितो तो लेखक, विवेक बुद्धीला मुरड घालून लिहितो त्याला लेखक कसे म्हणावे ? असा प्रश्न उपस्थित करून लेखकांना पुरस्कार नाकारण्याचा अधिकार आहे, तर साहित्य अकादमीच्या समितीला पुरस्कारासाठी निवड करण्याचाही अधिकार असतो हेही समजून घेतले पाहिजे, असेही ते यावेळी म्हणाले.

येथील महात्मा गांधी मिशनच्या ४३ व्या वर्धापन दिन कार्यक्रमासाठी मावजो येथे आले होते. तत्पूर्वी संस्थेकडून आयोजित ‘साहित्यिक गप्पा’ कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी माजी शिक्षणमंत्री तथा एमजीएमचे अध्यक्ष कमलकिशोर कदम, दिग्दर्शक जयप्रद देसाई, शैला मावजो, जयदेव डोळे, कवी श्रीधर नांदेडकर आदी उपस्थित होते.




## श्रीशैलमल्लिकार्जुन

ज्योतिर्मय साहित्य



त्यांच्या अंतरंगात श्रीशैलदेव मला बोलावीत आहे अशी उर्मी जागृत झाली.

अक्का देहातीत होत्या. त्या पूर्ण नग्न अवस्थेत, दिगंबर साध्वी होऊन श्रीशैल पर्वताकडे निघाल्या. जेवणाचे भान नाही. अंगावर वस्त्र नाहीत, त्याचीही तमा नाही. पूर्णपणे विदेही झालेल्या, परमात्मा एकटाच पुरुष व इतर सर्व स्त्री व पुरुष ही प्रकृती हा भाव त्यांचे मनात ठसावला होता. हा देह म्हणजे मी नाही ही भावना पक्की झालेल्या अक्का जंगलातून पायी अनवाणी चालत निघाल्या निघाल्या. मुखात अखंड शिवनाम त्याच बेभान अवस्थेत त्या चालत राहिल्या.रस्त्यात काटे कुटे होती. जंगली श्वापदे होती. यांची परवा त्यांनी केली नाही. त्यांच्या साधनेमुळे त्यांना रस्त्यात या श्वापदांचा काही त्रासही झाला नाही. असे म्हणतात, रात्रीच्या वेळी त्या चालत असताना एक दैवी प्रकाश त्यांना मार्गदर्शन करीत असे. नंतर अक्कांचे उर्वरित आयुष्य श्रीशैल पर्वता वरच गेले. श्रीशैल पर्वतावर एका अत्यंत अरुंद गुहेत त्यांनी साधना आरंभ केली. समाधित ही त्यांना भगवंताचे पूर्ण दर्शन झाले नाही. तेव्हा त्या म्हणाल्या माझ्यात राहणाऱ्या मल्लिकार्जुना मला दर्शन दे. तेव्हा गुहेच्या शेवटी त्यांना निळसर श्वेत प्रकाश दिसला. ती शिव तत्त्वाची उपस्थिती असल्याचे चिन्ह होते. तसेच त्याचवेळी त्या गुहेत अचानक जाई मोगरा अशा फुलांचा दिव्य सुगंध पसरला हे पार्वती माता तिथे उपस्थित असल्याचे चिन्ह होते. अक्कांनी आपले संपूर्ण जीवन साधनेत व्यतीत केले व त्यांनी तिथेच देहत्याग केला.

आपण या दिव्य स्थानाला भेट देवू तेव्हा या साध्वीच्या समाधीवर न विसरता जावयास हवे. या महान योगिनीच्या चरणावर वंदन करून हीच मागणी मागूया की तिची कृपेची दिव्य किरणे आम्हास प्राप्त होवोत.

जय मल्लिकार्जुन शिवप्रभु

जय ब्रम्हरंभामाता भवानी

***

# मिक्स डाळीचे क्रिस्पी वडे

ज्योतिर्मय साहित्य



डाळींमध्ये भरपूर प्रमाणात प्रोटीन असते .त्यामुळे आपल्या आहारात सर्व प्रकारच्या डाळींचा समावेश असणे अत्यंत गरजेचे आहे . म्हणूनच आज आपण मिक्स डाळीचे खमंग आणि कुरकुरीत वडे बनवू . काय..वड्यांचे नाव ऐकूनच सुटले ना तोंडला पाणी ? चला मग ,लगेंच बनवू ...आणी ते सुद्धा एका खास चटणी सोबत !

साहित्य : चटणी साठी : १० बिया आणि देठे काढलेल्या काश्मिरी लाल मिरच्या, २ हिरव्या मिरच्या , ४..५ लसूण पाकळ्या , १ नारळ खोवलेला ,१ मध्यम कान्दा , थोडीशी चिंच , १ चमचा साखर १ चमचा मीठ , अर्धी वाटी फुटाणे डाळ , ४..५ पुदिन्याची पाने , अर्धा चमचा उडीद डाळ ,कढी पत्ता , फोडणीस साहित्य .

वड्याचे साहित्य : अर्धी वाटी हरभरा डाळ ,पाव वाटी मुगाची डाळ , २ चमचे उडीद डाळ , २ चमचे मसूर डाळ , २ चमचे तूरडाळ, १ चमचा तांदुळाचे पीठ ,१ चमचा धने ,१ चमचा जिरे ,१ चमचा काळे मिरे , १ कांदा बारीक चिरलेला , ५..६ कढीपत्त्याच्या काड्यांची पाने ,अर्धी वाटी कोथिंबीर , अर्धा चमचा हिङ्ग ,मिठ ,तेल



सौ .स्नेहा मुसरीफ, पुणे .

चटणी कृती :

प्रथम गस्वार कढई ठेवून मध्यम व मंद आचेवर लाल मिरच्या कुरकुरीत होईपर्यंत ५..६ मिनिटे छान भाजाव्यात . मग त्या मिक्सरच्या भांड्यात घालून हिरव्या मिरच्या ,लसूण ,पुदिना ,मिथ साखर ,चिंच ,नारळ , कांदा व डाळवे घालून फिरवून बनवून घ्यावी .मग छोट्या कढल्यात १ चमचातेलघालूनमोहरी ,जिरे ,हिंग ,कढीपत्ता ,उडीद डाळ घालून खमंग फोडणी करून त्यावर घालावी .अशा प्रकारे केलेली खट्टीमिठी , स्पायसी चटणी एरवीही डोसा ,इडली ,सामोसे यांबरोबर सुद्धा छानच लागते .

आता आपण वडे करूया . त्यासाठी डाळी ५..६ तास आधी पाण्यात भिजवाव्यात .नंतर त्या रोळीत. .चाळणीत उपसून थोडी डाळ शेवटी घालण्यासाठी बाजूला ठेवून मिक्सर मधून फिरवून घ्यावी . सर्व फिरवुन झाल्यावर त्यात बाजुला ठेवलेली डाळ घालुन एकदाच व्हायपरवर किन्चीत फिरवावे . मग त्यात बारीक चिरून भरपूर कढीपत्ता , कांदा , कोथिंबीर , चवीनुसार मीठ घालून खलबत्त्यात जिरे ,मिरे , धने ,आवडत असेल तर अर्धा चमचा बडीशेप हे सर्व जाडसर कुटून घालावे . मग हिंग पावडर घालून बायंडिंग साठी तांदूळाची पिठी घालावी . हे छान मिक्स करून घ्यावे . १ चमचा कडकडीत करून तेल घालावे म्हणजे वडे खुसखुशीत होतात .

त्यानंतर गॅसवर कढईत तेल गरम करायला ठेवावे .

आता हे मिश्रण छान मिक्स करून त्याचे छोटे गोळे करून त्यांना दोन्ही हातांच्या तळव्यावर दाबून कडा एकदम पातळ होतील अशा रीतीने वडे थापावेत .कडा पातळ झाल्या की वडे क्रिस्पी होतात.

तेल व्यवस्थित तापले की गॅस थोडासा मध्यम करून त्यात वडे सोडून छान कुरकुरीत होईपर्यंत लालसर रंगावर तळावेत .व चाळणी मध्ये काढून सर्व्हिंङ डिश मधे काढुन चटणी बरोबर गरम गरम सर्व्ह करावेत .

वैशिष्ठ्य : हे वडे मिश्र डाळीचे असल्यामुळे पौष्टिक तर आहेतच पण डाळींची खूप सुरेख चव येते आणी क्रिस्पी असल्यामुळे खाताना खूप मज्जा येते. या खास चटणी बरोबर तर खूपच चटपटीत लागतात .




# आज फिर जीने की तमन्ना है

ज्योतिर्मय साहित्य

सुजय दुसऱ्या दिवशी घरी आला. त्याला सुखरूप पाहून सारे आनंदी झाले सारे गाव भेटायला आले.बाबा पण आता बरे होत चालले त्यामुळे आईची चिंता मिटली. फक्त दादा तुरुंगात आहे हे सुजयला बरे वाटले नाही. त्याने त्याच्या बाबतीत चूक केली पण त्याला सुधारण्यासाठी संधी द्यावी असे त्याला वाटू लागले.बाबांनी शांभवी मधील गूण ओळखून तिला निवडणूक उमेदवार म्हणून घोषित केले.सुजय स्वतः वकील असल्याने त्याने दादांची शिक्षा कशी कमी होईल ह्यासाठी प्रयत्न केले.

शांभवी मूळातच हुशार, धाडसी, प्रामाणिक आणि आपले मत ठामपणे मांडणारी होती तिला राजकारण करणं जमेल असं वाटतं होतं पण तिला ह्यामध्ये का जावे हा संभ्रम होता.. मग आजीने तिला सांगितले, बाळ ‘‘हे घर आज आनंदी तुझ्या मुळे आहे आणि तू व सुजय मिळून हा राजकीय वारसा पुढे चालू ठेवा. आज तूझी प्रतिमा एक धाडसी, कर्तबगारी स्त्री म्हणून आहे तू मनात आणलेस तर सारे शक्य आहे.‘‘ शांभवीने आईबाबांना विचारले आणि निर्णय घेतला. आणि अवघ्या महिन्याभरात तीने निवडणूक जिंकली.. साऱ्या घरादाराला आनंद झाला. सुजय देखील मनापासून आनंदी होता. रोजच्या धावपळीत त्यांना विश्रांती मिळावी म्हणून आई बाबांनी त्यांना बाहेरगावी फिरायला पाठवले. शांभवी आणि सुजय ने अतूट नाते जपले.. एकमेकांना साथ देत घरची जबाबदारी घेऊन राजकारण सांभाळून ते आता एकमेकांचे सोबती झाले.

एका वर्षानंतर शांभवीला गोड चाहूल लागली. आईने सासूबाईंनी तिची विशेष काळजी घेतली, सुजयच्या



आनंदाला सीमा उरली नव्हती. तो तिला काही काम करु देत नव्हता तो तिला हवं नको ते पहात होता. आणि एकेदिवशी छोटी परी त्याच्या कुशीत आली.. सगळ्यांना आनंद झाला.

तिला गोड नाव दिले ‘‘ सौम्या ‘‘ तिचे लाड कौतुक करत दिवस गेले. काही दिवसांनी दादा तुरुंगातून बाहेर आला व सुजय पुढे पश्चात्तापाचे अश्रू गाळू लागला.पण सुजयने त्याला आधीच माफ केले.दादा व वहिनी आता शेतातील घरी राहू लागले.



सौ.प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर मो. 95525 61612

सौम्या मोठी होत होती, सुजय आता सगळ्या कामामध्ये यश मिळवत होता.. शांभवी ने जमेल तितकी साथ देत नाय

भरभराटीस आणला होता. पण कुठेतरी निर्मळ आनंद घेणारी शांभवी पोक्त पणाच्या, समंजस पणाच्या शर्यतीत पुढे गेली होती हे तिला जाणवू लागलं.. जीवनाचा प्रवास ज्या वळणावर नेईल तिकडे जावेच लागते. ती शांत झाली आणि पुढे कामात व्यस्त झाली.

सुजयला वेगवेगळ्या प्रकारची झाडे,लावणे कुंडीत रोप लावणे, बागकाम ह्यांची आवड होती त्याने तर घरापुढे अत्यंत सुंदर बाग सजवली होती पाहताच शांभवी प्रसन्न होऊन जायची रोज सकाळी वेगवेगळ्या प्रकारची फुले सुजय तिला आणून द्यायचा, एकदा एका लहान मुलांच्या शाळेचे स्नेहसंमेलन आयोजित केले होते आणि त्या साठी सुजय आणि शांभवी ला निमंत्रण आले होते.

सकाळी उठून सगळी कामं आवरून ते संध्याकाळी शाळेत पोहचले उद्घाटन झाले लहान मुलांना नाचताना पाहून शांभवी फार आनंदून गेली. तीने स्वतः मुलांचे कौतुक केले, प्रोत्साहन दिले.सुजय आणि ती जेव्हा घरी आले तेव्हा सुजय तिच्या उत्साहीत चेहऱ्याकडे पाहून आश्चर्यचकित झाला.

**(क्रमशः)**




## कृष्णकुमार पाटणकर यांना डॉक्टर पदवी बहाल

ज्योतिर्मय साहित्य

अर्जूनी/ मोरगाव - गोंदिया जिल्ह्यात येणाऱ्या मूळ गाव माहुरकुडा येथील व सध्या सुराबर्डी नागपूर येथे वास्तव्यास असणारे भारतीय सेनेचे माजी सैनिक डॉ.कृष्णकुमार रामदास पाटणकर यांचे प्राथमिक शिक्षण माहुरकुडा या स्वगावी झाले. एका शेतकरी कुटुंबात जन्मलेले डॉक्टर कृष्णकुमार यांना बालपणापासूनच देश सेवेची ओढ आणि शेतकऱ्यांविषयी तळमळ व समाजसेवेची आवड होती. पुढचे शिक्षण त्यांनी महागाव येथे घेतल्यानंतर लगेचच त्यांना भारतीय सेनेत नौकरी मिळाली. सतरा वर्षे नौकरी केल्यानंतर, व निवृत्ती घेतल्यानंतर सध्या जलसंपदा विभाग सावनेर नागपूर येथे कालवा निरीक्षक या पदावर कार्यरत आहेत. त्यांची देशसेवा व समाजाप्रती असलेले योगदान बघून १४ डिसेंबरला गांधी आश्रम सेवाग्राम वर्धा येथे इंटरनॅशनल गांधी प्लेस फाउंडेशन नेपाल तर्फे त्यांना मानद डॉक्टर ही पदवी बहाल करण्यात आली. या शुभ प्रसंगी डॉ.सुनिल परदेशी, डॉ.एन.एस.मानकर, डॉ.मनोहर चव्हाण व इतर क्षेत्रातील मान्यवर बहुसंख्येने उपस्थित होते. डॉ. कृष्णकुमार पाटणकर यांनी सर्वांचे आभार मानले. भारतीय सेनेत नौकरी करत असताना सुद्धा त्यांनी मोलाचे योगदान देऊन अभ्यास व जिद्द चिकाटीने डॉक्टर पदवी मिळवून समाजासमोर त्यांनी आदर्श निर्माण केला व पुढचे आयुष्य समाजासाठी घालविण्याचा त्यांनी संकल्प सुद्धा केले आहेत. डॉ. कृष्णकुमार हे नागपूर, विभागातील पहिले माजी सैनिक आहेत. त्यांच्या या घवघवीत यशाबद्दल सर्वच स्तरावरून त्यांचे अभिनंदन केले जात आहे.






# कवितेच्या लाटावर...

कवितेच्या लाटावर...

## आईचा खांदा,!

खांदा मिळता आईचा
मान टाकून देतो,
मग तिथूनच टकमक
अवतीभवती पाहतो,

बघतात लहान थोर
माझ्याचकडे सारे
फुले, पिले सगळ्यांची
मुले, माणसे, पाखरे,



काही हसती बघून,
काही गाल ओढतात
दुरून घेतात पापा ,
मला 'गोड' म्हणतात,


बघता बघता डोळे
जातात थकून,
आई हळूच मला
घेते पदरात झाकून,

मग खांद्यावरच तिच्या
एका छान झोप होते
माझे उघडताच डोळे
घर माऊचे येते,!

कडेवर, हातावर,
आई मांडीवर घेते,
काम असले तिला की,
मग झोळीत टाकते, !

©®©®
सौ. मनोरमा भारत बोराडे
सहशिक्षिका
छत्रपती संभाजीनगर

## खळी



*तुझ्या गालावर जी खळी पडते,*
*नजर त्याला माझी बळी पडते*

*इशाऱ्याने बेभान होते अन*
*गुलाबी छाया सावळी पडते*

*तुला येतो भेटायला भुंगा*
*जिथे सुंदर चाफेकळी पडते*

*तिचा हळवासा स्पर्श झाल्यावर*
*फुलाची हलकी पाकळी पडते*

*छबी दिसते पाण्यात,तेव्हा तर*
*इथे शहराला निर्जळी पडते*

*बहर खुललेला भेट घडते,पण*
*मधे दोघांच्या झावळी पडते*

*दिरंगाई का भेटण्याला करते*
*मनावर मोठी पोकळी पडते*

~~~~~~~~~~~~~~
*® रज्जाक शेख श्रीरामपूर*
*9665778558*

## प्रतिरूप माझे..

शब्द न्यारेच आणि गंधीत वारे होते..
तू येताना जाताना वेगळे नजारे होते...

कुशीत घेता तुज श्वास निस्तब्ध झाला
अबोध मनाची भाषा नयनी पहारे होते...

निरंजनातील वात शांत तेवत होती
थिजल्या दोन क्षणांचे रिते गाभारे होते..

तू प्रेरणा या मनाची, सुप्त परिभाषा
जन्मत:च तुला कसे प्रतिभेचे निवारे होते..

लेखणीतून उतरलेले तू प्रतिरूप माझे
स्वप्न गहिरे मन लहरीत तुझेच इशारे होते...

@ काव्य प्रतिभा
प्रतिभा महादेव चौगले
कोल्हापूर



## परी आणि मी

*भर दुपारी*
*एक परी*
*मला म्हणे,*
*"चल माझ्या घरी"*
*मी म्हणाले, "नाही,*
*रागवेल ना आई,!*
*नको ग बाई,*
*यायचे मला नाही,! "*
*हसुन ती म्हणे,*
*"रागवेन कशी?*
*जादुची उशी,*
*ठेवली तिजपाशी,*
*झोपेल ती आता !*
*नको करू चिंता !*
*माझ्या घरी,*
*दुधाची नदी,*
*पेठ्याचा वाडा,*
*हरीणींचा वेढा,*
*फुलांची गादी,*
*खेळायला ससे*
*बोलणारे मासे,*
*आठवणार तुला*
*नाही कुणी,*
*आई नि बाबा,*
*भाऊ नि वहीनी,!"*
*क्षणभर वाटले,*
*जाऊनच याव,,*
*पेठ्याचा वाडा,*
*हरिणी, ससे,*
*बोलणारे मासे,*
*असतील कसे?*
*बघूनच घ्याव,*
*म्हणाले, "हो,"*
*निघाले तडक*
*परीच्या सोबत*
*उडत उडत*
*दुरून बघताच*
*पेठ्याचा वाडा*
*जीव झाला वेडा*
*बोलू लागले मासे*
*म्हणतात कसे?*
*काय तुझ नाव?*
*खाणार तु काय?*
*दुधाची साय?*
*गुलकंदाचा शिरा?*
*सश्यांनी मारल्या*
*भोवताली उड्या*
*हरीणींनी केल्या*
*गंमती थोड्या*
*परी सोबत आली*
*मज्जा खुप खुप*
*नंतर मात्र मला*
*करमेना झाल*
*माझ्याच घरी*
*राहाव वाटल*
*आईची कुशी*
*नाही कुठे तशी*
*माझे बाबा छान*
*भाऊ जीव प्राण*
*सुरेख वहिनी*
*आम्ही मैत्रिणी,*
*आले मी निघून*
*सरळ घरी*
*तरीपण आवडली*
*मला परी !*



*©®©®*
*सौ. मनोरमा भारत बोराडे,*
*सहशिक्षिका*
*छत्रपती संभाजीनगर*

## संत गाडगे बाबा

*हाती गाडगे करी पाषाणी टाळा*
*मुखे नामाचा गजर देवकीनंदन गोपाला //*

*कीर्तनातुनी प्रसवे अमृतवाणी*
*करी ग्रामसफाई अंधश्रद्धेवरी घाला //*

*सृषयासृषय कोण असती*
*पुसारे त्या परमेशाला //*

*साक्षर जनता भूषण भारता*
*आळस वैरी असे जीवनाला //*

*सेवा करुनी मनोभावे*
*भारत माता की जय बोला //*

*कवी दुर्गादास दि.पळसकर पुणे*
*भ्रमणध्वनी क्र. ७३८७९२३८९५*



## बलिदान

रिश्तों की डोर में बंधा एक बंधन था,
हम दोनों के लिए एक दूजा नाम था।
वो लड़की अपनी ही धुन की मालकिन थी,
पर एक आवाज़ सुनकर, मेरी ही सुनती थी।

प्यार वो गहरा सागर था, किनारे नहीं,
पर किस्मत ने रची थीं कठोर दीवारें कहीं।

सामने थी उसकी बहनों की हँसी,
पीछे थी दो परिवारों की अधूरी ज़िंदगी।
समाज की बेड़ियाँ, और बुज़ुर्गों का डर,
अगर हम मिलते, तो बिखर जाते सब घर।

ख़ुद-कुशी की बातें, और भारी वो मौन,
फैसला था मुश्किल, अब चुने हम किसको।

अपना इश्क़ एक तरफ़, और सबकी ख़ुशी दूजे,
हमने दिल पर पत्थर रख कर वो फ़ैसला था किया।
वो आख़िरी मुलाक़ात, वो भीगी-सी आँखें,
कहा उसने, हम साथ कभी न रह पाएँगे।

वक़्त ने भरी थी ज़ख्मों पे हल्की धूल,
नई राह पर चलने का, किया था मैंने क़बूल।

ये दूरी कहाँ है, बस आँखों का धोखा है,
हर साँस में मेरी, तेरा नाम लिखा है।
त्याग किया हमने, मगर प्यार आज भी ज़िंदा है,
दस साल का फ़ासला भी, रूह से रूह को मिलता है।

आज जीवन का साथी है, और मेरा छोटा फूल है,
पर उस प्रेम का एहसास आज भी क़बूल है।

हम दूर सही, पर रिश्ता अमर कर गए,
दूसरों के लिए, अपनी मंज़िल से मुकर गए।

- आर्यन जैस्वाल



## मैत्री



संध्याकाळच्या सावल्यांमध्ये
हळूच कुणी येऊन बसावं,
शब्द नकोत, मात्र तरीही
मन आपलं ओळखून घ्यावं

हसण्यातल्या त्या क्षणांना,
डोळ्यांमध्ये साठवून ठेवावं,
दु:ख आलं की नकळतच
खांद्यावरी डोकं टेकवावं.

वाट हरवली जेव्हा जेव्हा,
हात हातात गुंफले जावेत,
पावलांना बळ देताना
स्वप्नांनाही पंख मिळावेत.

काळ बदलेल, ऋतू बदलेल,
नातं मात्र तसंच राहावं,
जीवनाच्या प्रत्येक ओळीत
मैत्रीचं नाव लिहावं...

उद्धव भयवाळ
छत्रपती संभाजीनगर 431009
मो. 8888925488

## बदल...

एवढे बदल व्हावे का..?
अंग उघडे करून फिरण्याची वेळ आली
ही संस्कृती आहे का आपल्या देशाची. .?
आजची महिला एवढी बदलून गेली

उच्च शिक्षण घेऊन मोठी झाली
समोर गेली आपल्या कलागुणांने
अंगप्रदर्शन तिला का योग्य वाटते..?
सजा का भोगावे त्या लहान बाळाने...?

एवढे बदल कशासाठी. ..?
अभिमान अन् गर्वाची संगत
धरून कोणी काहीच नेत नाही
जशी संगत अन् तशीच पंगत

हा एवढा बदल बघून
निसर्गही मागे राहत नाही
जसे कर्म तसेच फळ मिळतात
हे असेच फुकट म्हणत नाही

ह्या बदललेल्या स्वभावामुळे
आपुलकीही संपत चालली
सत्याला राहिली नाही जागा
अशी ही आजकाल कली मातली

जमान्यानुसार माणसाने बदलावे
पण, माणुसकी, संस्कृती विसरू नये
जेव्हा निसर्ग बदलतो तेव्हा
त्याला कोणी नाव ठेवू नये

माणूस आता कोणाला म्हणावे..?
दैनंदिन वाढत चालले अत्याचार
एवढा असा, कसा बदल होत आहे .?
नाही घेत कोणी चुकीची माघार

सौ.संगीता संतोष ठलाल
मु. कुरखेडा जि. गडचिरोली
७८२१८१६४८५



## कविता...



*रात्रंदिन मज चैन नाही,*
*कवितेचे वेड अंतर्यामी।*
*किती ठरविले मनात काही,*
*आज कविता करायची नाही।*
*शब्दांची आवर्तने पिंगा घाली,*
*एकामागून फिरतीभवताली।*
*मनी सदैव काव्य स्फुर्ती येई,*
*स्वप्न कळ्या उमलून फूल होई*
*विचारांच्या आवर्तने मन भरून,*
*कविता येते नव्याने स्फुरून ।*
*विषय तिला चाले कोणताही,*
*आशयघनात येई सर्व काही*
*ओघवत्या बरसती विचारधारा,*
*शब्द फुलांचा गुंफते गजरा।*
*कधी न वाटले होते मनाला,*
*काव्यफुले देईन मी जनाला।*
*आभाळ भरून शब्द उलगडले,*
*झेपावून मोबाईल वरी उमटले*
*काव्य हेच जगणे होत राहिले,*
*रसिकांच्या अभिप्रायी मोहरले।*
*निशब्द त्या रसनेला काव्यबोलते*
*करुनि केले,शब्दकाव्य झेलते।*
*मनास कळले, अन उत्साहाचे*
*भरते स्फुरले नवकाव्यउर्मिचे।*
*कवितेने हृदयी, ठाणे मांडले*
*रसिकांच्या मनी ते स्थिरावले।*

*स्वप्नगंधा सतीश आंबेतकर*
*विरार, मुंबई*

## सु सांगता ..



*पुस्तक महोत्सवांत*
*गर्दी अलोट लोटली*
*साहित्य सहवासात*
*शब्दलज्जत लुटली*
*निवडक पुस्तकेग्रंथ*
*विक्री सिमा गाठली*
*कैक मात्र हिरमुसले*
*विक्रीजागीचंगोठली*
*उत्साहमहोत्सव करे*
*तरूणाई भारीपेटली*
*बदलूनि आपले मार्ग*
*साहित्यिकांसभेटली*
*उक्ती ती खोटी ठरली*
*रे वाचनक्षुधा आटली*
*वळे पाऊले मराठीची*
*संस्कृतीरक्षणांदाटली*
*मना मनात नवी तृषा*
*वाचक दालने थाटली*
*खरेदी करुनि पुस्तके*
*नाताळाआधि वाटली*
*सुधे जिव्हा मधाळली*
*चव होती पार विटली*
*धार्मिक संपदा विशेष*
*जन्मातरीभूक मिटली*
*सम्मेलन संयोजनार्थ*
*रसिक मंडळी झटली*
*कृतकृत्य सार्थ प्रयास*
*आठव अंतरी साठली*
*- हेमंत मुसरीफ पुणे*
*9730306996*

## हुरडा कार्टी..

*रिसॉटस् हॉटेलामध्ये*
*खासअॅरेंज हुर्डापार्टी*
*थोरमोठेही सुखावले*
*खिदळूलागली कार्टी*
*सजली साक्षात खेडी*
*गवताची सुरेख घरटी*
*एटीकेटची ऐशी तैशी*
*उधळली मने ती हट्टी*
*लाजेल रांगोळीसुध्दा*
*धुळीनी काढली बुट्टी*
*रेड कार्पेटची सवय रे*
*प्रथमचं स्पर्शली मिट्टी*
*गाय बैल पाहे शेळ्या*
*नकळत वाजवीशिट्टी*
*कम्प्युटर वाले हे हात*
*चालवती कडबा कुट्टी*
*असो बिलियर्ड महान*
*मजा आणे दांडू विटी*
*ए सी कारवाले सगळे*
*बैलगाडीत करी दाटी*
*पिझ्झा बर्गर फिकेपडे*
*ठेचा भाकर डाळबाटी*
*टेबल मॅनर्स खिदळता*
*करतो मुक्त वाटा वाटी*
*धन्यवाद रे बळी राजा*
*शब्द हिंदाळतातओठी*
*माणसा पेक्षा कैकपटी*
*माणूसकी जास्त मोठी*
*- हेमंत मुसरीफ पुणे.*
*9730306996.*



## गेले द्यायचे राहून

*आठवते का तुला, द्यायचे होते*
*तेंव्हा तुला, खूप काही अजूनी,*
*काय ते माहित नव्हते, तेंव्हा पण*
*आज कळते, गेले द्यायचे राहूनी.. धृ..*

*दूरवर विसावल्या होत्या त्या सावल्या*
*उन्हाच्या त्या काहिलीतूनी*
*कल्लोळात उसळलेला तो सागर*
*येत होता मुक भावनांत ऊचंबळूनी.*
*दोन पानांची ऊन सावली सम भेट*
*पांगली क्षणिक त्या ऋतू चक्रातूनी..*

*निस्तब्ध अशा अशांत त्या वेळी,*
*हातात हात तो गुंफुनी,*
*थरथरते कातर ओठ, अन्*
*चिंब ओल्या त्या आठवणी*
*आसवांत भिजत सांगत होत्या*
*बरेच काही गेले द्यायचे राहूनी..*

*आठवणींचे गुपित मनाच्या शिंपल्यातला*
*अलवार अवखळ तो मोती बनूनी.*
*सागर किनारी ओसंडून वाहू पाहे,*
*तूषाराचा तो एक एक थेंब होवुनी.*
*अल्लड त्या सांजेला तोडून गेली*
*लाट दोन दिशा दिशा होऊनी..*

*© सौ.वैशाली महाडिक, सातारा*
*मो. क्र.-९७६७४३७९२३*

## शांतता स्थिरत्वासाठी...

वृक्षतोडीने जंगल, वने संपत चालले
बिबट्यांना रान, शहर मोकळे झाले
बिबट्यांची, वाघांची घरे नष्ट झाली.
म्हणूनी, त्यांनी शहरांची वाट धरली
शेतातील जनावरांवर घाव घालूनी त्यांनी
सहजची! कुत्रे, गाई, म्हशी फस्त केल्या
गाव, शहरांमध्येही त्यांनी बेधडकपणे घुसूनी
मुले, मुली, बाया, माणसांवर घातला घाला
त्यांना माणसांच्या रक्ताची चटक लागली
दिवसाही माणसांवर झडप घालू लागली
अशा कशा विपरित घटना इथे घडू लागल्या
का! त्या यंत्रणा हात झाडूनी मोकळ्या झाल्या
सरकारी योजना, उपाय कागदांवरंच राहिले
निष्पाप, गरीब माणसें मात्र फूकट मारले गेले
जंगल तोडणा-यांवर कारवाई न करतो कोणी
सारेजण एकत्र मिळूनी खाती पैशांचे लोणी
शासन देत आहे जनतेला सुरक्षित आश्वासने
दृढ कृती नाही,अघोषित होती बिबट्यामरणे
काहींच्या धनहव्यासापायी ही वेळ आहे आली
त्यास्तव, महाराष्ट्रीय जनता आहे धास्तावली
जनतेलांच आता स्वत:ला ही लढाई लढणे आहे
शासनयंत्रणेला स्थिरत्वासाठी भाग पाडणे आहे

काव्यरचना : मधुकर ए. निलेगावकर, पुणे



## पायलट

*पायलट होऊनी बसुनी विमानी*
*आकाशी विहार करूया हो.*
*पक्षाप्रमाणे आकाशातून,*
*प्रथ्वी आपण पाहुया हो.*
*एक फेरी प्रदेशक्षिणेची प्रथ्वीला मारुया हो.*
*गगन धरेचे मिलन जेथे तेथील गंमत पाहूया हो.*
*आकाशातून उडती पक्षी,*
*आकाशात जणू दिसते नक्षी,*
*विमान उडते कृत्रिम पंख लाऊनी*
*विमानास उडण्या लागे भरपूर इंधन,*
*संपता इंधन होई धरतीवरी त्यांचे आगमन*
*आकाशयानाव्दारे उपग्रह जाती आकाशी,*
*शास्त्रज्ञ् बसे इथेच अन बोले परग्रहाशी*
*चंद्रावरती जाण्यासाठी घेतले त्याने उड्डाण.*
*चंद्रावरती उतरुन मिळविले वेगवेगळे ज्ञान*
*सखोल माहिती केली गोळा*
*भारताच्या या चांद्रयान मोहीमेने*
*सफल झाली मोहीम अलकानंतसूत म्हणे*

*श्रीपाद अनंत दसरे*
*छ.संभाजीनगर, मो. 9975950801*




## रिश्ता...

मैंने मित्र बनाए,
रिश्तेदार बनाए,
संबंधों की माला गुथी
हर मोती को प्रेम से पिरोया,
हर धागे में उम्मीद बाँधी।

कभी किसी की खुशी में शामिल हुआ,
कभी किसी के आँसू पोंछे,
कभी खुद टूट कर भी मुस्कुराया,
कि कोई मेरे दर्द को महसूस न कर पाए।

हर जन्मदिन, हर त्योहार पर
संदेशों की भीड़ लगती रही,
कुछ औपचारिक मुस्कानें,
कुछ सच्चे आलिंगन
और मैं सोचता रहा,
"कितना समृद्ध हूँ रिश्तों में..."

पर वक्त की आँधी चली,
तो कुछ नाम उड़ गए,
कुछ चेहरे धुँधले पड़ गए।
जिन्हें मैंने अपना समझा,
वो भी धीरे-धीरे
सुविधा के हिसाब से बदलते गए।

मैंने पूछा खुद से
क्या ये रिश्ते सच्चे हैं?
क्या ये मेरे अंतिम समय में
मेरे साथ चलेंगे,
मेरे साथ जलेंगे?

या बस सोशल मीडिया पर
एक संदेश लिख देंगे
"श्रद्धांजलि, ओम शांति..."

जीवन ने धीरे से उत्तर दिया
"रिश्ते नदी के किनारे की रेत हैं,
जब तक पानी पास है,
ये ठोस लगते हैं,
पर जैसे ही लहर पीछे जाती है,
सब बिखर जाता है।"

तब समझ आया
कि साथ चलना एक भ्रम है,
हर कोई बस उतनी दूरी तक चलता है,
जहाँ तक उसका स्वार्थ या सुविधा साथ देती है।

बाकी यात्रा तो
हर इंसान को अकेले तय करनी होती है।

अब मैं रिश्तों से नहीं भागता,
पर उनसे उम्मीद भी नहीं रखता।
अब हर मुलाकात में अपनापन देता हूँ,
पर किसी से अपनेपन की उम्मीद नहीं करता।

क्योंकि अब जान गया हूँ
रिश्ता वही सच्चा है,
जो मन के भीतर खुद से जुड़ता है,
जो न शिकायत करता है,
न हिसाब मांगता है।

बाकी सब रिश्ते
काँच के जैसे हैं,
चमकते हैं, मगर टिकते नहीं,
थोड़ी सी ठोकर लगी नहीं
कि बिखर जाते हैं।

अब मैं अकेला नहीं,
बल्कि पूर्ण हूँ,
क्योंकि मैंने खुद से
अपना रिश्ता जोड़ लिया है।

@ मीश्री...

## ओझं...

आपण सर्वजण
वहात असतो
कसले न कसले ओझे
कोणी कोणाच्या प्रेमाचे
तर कोणी
स्वत:हून घेतलेल्या जवाबदारीचे
चैनीसाठी घेतलेल्या कर्जाचे
तर कोणी
न घेतलेल्या
कर्जाच्या परतफेडीचे
आज प्रत्येकजण दबलेला आहे
मानसिक ओझ्याखाली
स्ट्रेस, ताणतणाव झालाय
सगळ्यांचाच जिवलग मित्र
आनंदाचे ओझे का नको आहे
कोणालाच ?
स्वत्वामुळे सगळे देत आहेत
आनंदाचा बळी
अन स्वत:हून जातात
दु:खाच्या ओझ्याखाली
ओझे असावे पण
प्रेमाचे, प्रामाणिकपणाचे
चुकीचे काम न करण्याचे
समाजसेवेचे, देशसेवेचे
सर्वांना आनंदी ठेवण्याचे
जमलेच तर
एखाद्याचे ओझे कमी करण्याचे...

@संजय काव्या 7743918559



## पेंशनर....

नरात नर सर्व श्रेष्ठ नर मी आहे पेंशनर //
म्हातारी माझा करते लई थाटमाट
ईलू ईलू म्हणून देते बसाया पाट /
मुलगा सून म्हणते बाबा सेवा काय करू
नातू म्हणतो आबा चॉकलेट घेऊ /
लेक जावाई म्हणतात आहे मज्जा
करून खाऊ घालतात भजेभाजा /
सोयरे धायरे म्हणतात राव तुमचा आहे वोट
पण कधीमधी देत जा आम्हास पाचशेची नोट /
कुत्रा लाडीगोडी येवून हालवतो शेपूट
म्हणतो मालक मी तुमचा राखीण बुट/
अख्ख जन (लोक) म्हणते मला धनी
कारण मज जवळ आहे मनीच मनी /
नरात नर सर्व श्रेष्ठ नर, मी आहे पेंशनर //

कवी दुर्गादास दि. पळसकर पुणे
भ्रमणध्वनी क्र. ७३८७९२३८९५



हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559
~~~~~~~~~~~~~~